**"जानेवारी २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ५ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय उपाहारगृहामार्फत चहा ट्रे सर्विसव्दारे पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- दिनांक ६ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अनुकंपा प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठतेनुसार नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.
- दिनांक ६ जानेवारी २०२१ च्या शासन शुध्दीपत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबरोबर पत्रव्यवहार करताना अनुसरावयाच्या कार्यपद्धतीच्या सर्वसमावेशक आदेशातील परिच्छेद-४ वगळण्यात येऊन, त्याऐवजी सुधारित परिच्छेद समाविष्ट करण्यात आला आहे.
- दिनांक ७ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवेतील नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या ५ अधिकाऱ्यांचे वेतन सामान्य प्रशासन विभागामार्फत अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- दिनांक १४ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी All in One अंतर्गत २५ संगणक खरेदी करण्यास व त्यापोटी येणाऱ्या रु.१०.६२ लाख इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक १५ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन कार्यक्रमाकरिता ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे जानेवारी २०२१ करिता रु.३,५४,७००/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १९ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (सीपीटीपी-२) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ४ तहसिलदार, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २० जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी संवर्गाची दिनांक १ जानेवारी २०२० व १ जानेवारी २०२१ ची प्रत्येक वर्षनिहाय ७६७ इतकी पदसंख्या निश्चित करण्यात आली आहे.
- दिनांक २७ जानेवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन कार्यक्रमाकरिता ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे जानेवारी २०२१ करिता रु.३,५४,७००/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- अवर सचिव-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.

## (ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- एका कक्ष अधिकाऱ्याला प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- तीन कक्ष अधिकाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- सात कक्ष अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

## (घ) ज्येष्ठतासूची

- दिनांक १३ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३७ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १३ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील १८१ निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १३ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील २०१ उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १३ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील १६ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १३ जानेवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ४५ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची तात्पुरती सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****